# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. २१/०९/२०११

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दिनांक २१/०९/२०११ रोजी सभा सुचना क्र. १४ दि. १६/०९/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉ. मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २. | श्री. चंद्रकांत भि. मोदी | सदस्य |
| ३. | श्री. दिनेश दगडु नलावडे | सदस्य |
| ४. | श्री. चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | सदस्य |
| ५. | श्रीम. सुधा वासुदेव व्यास | सदस्या |
| ६. | श्रीम. निर्मला बा. सावळे | सदस्या |
| ७. | श्रीम. कॅटलीन परेरा | सदस्या |
| ८. | श्री. राजेश म्हात्रे | सदस्य |
| ९. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| १०. | श्री. लक्ष्मण जंगम | सदस्य |
| ११. | श्री. भगवती तु. शर्मा | सदस्य |
| १२. | श्री. शशिकांत भोईर | सदस्य |
| १३. | श्रीम. मुसर्रतबानो शेख | सदस्या |
| १४. | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे | सदस्या |
| १५. | श्री. रामनारायण दुबे | सदस्य |
| १६. | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य – निरंक</u>**

**मा. सभापती :-**

सचिव साहेब, सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दि. २१/०९/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १४, दि. १६/०९/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ७७, दि. २३/०६/२०११ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**शशिकांत भोईर :-**

पान नं.८ वर माझं संभाषण खालुन दुसरी लाईन आहे. त्याच्यामध्ये दुसरी ओळ त्याचं जर निवेदन प्रशासनातर्फे झालं तर बरं होईल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो इतिवृत्तांत मंजूर करताना वाहनाचं राहिलं होत ठराव करताना.

**शशिकांत भोईर :-**

वाहनामध्ये दुरुस्ती करायची आहे. प्रशासन आणि जे अधिकारी आपली वाहनं वापरतात त्यांची पण डिमांड आहे की, आम्हाला वाहन भत्ता वाढवून द्यावा. त्यांनी आपल्याला विनंती केलेली आहे. त्यांना १०,०००/– रुपये देतो. वाहनात दुरुस्ती करुन १५,०००/– रुपये द्या. डिजेलचे भाव वाढलेले आहे. तसेच पदाधिका-यांना वाढीव वाहनभत्ता द्यावा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ठरावात लिहावं लागेल.

**शशिकांत भोईर :-**

त्याच्यामध्येच घ्या ना.

**लक्ष्मण जंगम :-**

सध्या आपण वाहन भत्ता किती देतो?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

१०,०००/-

**लक्ष्मण जंगम :-**

आणि आपण किती देणार आहोत?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आपण ठरवाल तसे.

**लक्ष्मण जंगम :-**

किती टक्के डिजेलमध्ये वाढ झाली? किती टक्के सरासरी झाली? डायरेक्ट १५,००० रुपये म्हणजे त्याचं ॲव्हरेज वगैरे काढलं?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

इतर महापालिकेत १७,००० रुपये, १७,५०० रूपये ठाण्याला २०,००० रूपये आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

म्हणजे आपण १५,००० रूपयामध्ये बरोबर आहोत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

कसं आहे की, जर आपण त्याच अधिकाऱ्याला भाड्याने द्यायचं म्हणजे ३०-३०, ३४-३४ हजार रुपये द्यायला लागतात. त्यापेक्षा वाहन भत्ता दिलेला बरं.

**भगवती शर्मा :-**

दुरुस्ती तसेच अधिकारी यांना वाहन प्रति मासिक भत्ता १५,००० रूपये पदाधिकाऱ्यांस करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर आणि भगवती शर्मा यांनी मांडलेला दुरुस्ती सह ठराव मंजूर दुरुस्त करण्यात यावा.

**भगवती शर्मा :-**

दि. २३/०६/२०११ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**शशिकांत भोईर :-**

याला माझे अनुमोदन आहे. मा. सभापती साहेब, या इतिवृत्तांतात असं आहे की, मागील मिटींगमध्ये आपल्याला सुचना केलेली जे ट्राफिक डिपार्टमेंट आहे त्याचे मेन इनचार्जला तुम्ही बोलवणार होते आणि तुम्ही पण सांगितलेलं की, पुढच्या मिटींगमध्ये बोलवतो. परंतु, आज ही दुसरी मिटींग आहे आणि आजही ते उपस्थित नाही. जास्त करुन येणारा दिवाळीचा सण तिथे रहदारी पण जास्त होते. वाहनाची वर्दळ आणि नेहमी गोल्डन नेस्ट सर्कल पासून फाटक आहे. तिकडचे टेम्पो स्टँड आणि कॅबिन रोडचे रिक्षा गॅरेज, तुम्ही बोलले की मी ते नियंत्रणात आणतो पण आजही त्यांना तुम्ही आणलं नाही. प्रशासनाने पत्र दिलं नाही की?

**मा. आयुक्त :-**

मी त्यांना पत्र दिले होते, पण ते आजही उपस्थित नाही तर त्या विषयावर मी एस.पी. यांच्याशी बोलतो.

**शशिकांत भोईर :-**

कारण ही रोजचीच गरज आहे.

**मा. आयुक्त :-**

मागच्या वेळेला पण असा विषय आपण काढला होता आणि हा विषय महत्वाचा आहे म्हणून मी एस.पी. साहेबांशी बोलतो आणि पुढच्या मिटींगमध्ये त्यांची उपस्थिती पाहिजे या विषयावर त्यांच्याशी मी बोलतो.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, मा. आयुक्त साहेबांना माझी विनंती आहे की, आपण अशी परिस्थीती आणु नका की, त्यांना इथे यायला लागेल त्याच्या अगोदर जर ते निघत असेल ते ट्राफिक हटत असेल तर उत्तम मिटींगची वाट पहायला आम्हाला गरज नाही.

**भगवती शर्मा :-**

कई मुद्दे है। उनको अगर बुलायेंगे पार्किंग जो पार्किंगवाले काफी मुद्दे है। उनसे डिस्कशन करेंगे तो अच्छा होगा।

**शशिकांत भोईर :-**

याबद्दल डिस्कशन पूर्ण झाले. नो पार्किंग कुठे पाहिजे सगळं केलं. पण त्याची कारवाई होत नाही ना त्याबद्दल आयुक्तांनी एस.पी. साहेबांशी बोलण केलं आणि ताबडतोब कारवाई सुरु झाली तर उत्तम होईल कुठे पण मग मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये जिकडे नो पार्किंग होईल जिथे नो पार्किंग त्या ठिकाणी पार्किंग झाली तर

त्याच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे आणि जिथे टेम्पो स्टँड नाही, किंवा रिक्षाच गॅरेज नाही तिकडून पण उचललं तर उत्तम होईल शासनानी सांगितलं आणि शासनाने उचलल्या गाड्या तर शासनाला रेव्हेन्यू जमा होईल कुठे महापालिकेला जमा होणार नाही. महापालिका फक्त टोईंग वॅन काय पूरवत असेल ते पुरवते पण कारवाई होणे गरजेचे आहे कारण दिवसेंदिवस वाढत चाललेलं आहे आणि येताना जाताना आम्हालाही त्रास होतो जर कोणताही रुग्ण ॲम्ब्युलन्स मध्ये असेल तर त्याला हॉस्पीटलमध्ये पोचता पोचता त्याला आणखीन इजा होऊ शकते. असं होऊ नये म्हणून आयुक्तांनी मिटींग लावण्यापूर्वी त्यांच्या स्तरावर कारवाई केली तर बरं होईल.

**प्रकरण क्र. ७७ :-**

दि. २३/०६/२०११ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ६६ :-**

दि. २३/०६/२०११ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. शशिकांत भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.७८, मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**भगवती शर्मा :-**

प्रकरण क्र.७८ पर मै थोडीसी चर्चा करना चाहूँगा। मा. सभापती साहब आपकी परवागनीसे शहर की स्थिती आरोग्य के बारे मे बत से बत्तर होती जा रही है। पिछले साल भरसे १ साल हो गया है। मा. आयुक्त साहब, आप इस विषय पर थोडासा ध्यान दिजिए की कोई भी नगरसेवक अपने वॉर्ड के बारे मे यह नही बोल सकता की वहाँ दवा की, फवारणी हूई, मच्छर की दवा की फवारणी हूई पावडर का छिडका हुआ। अभी इस शहर की स्थिती ऐसी है आप अस्पताल से आकडे मंगाऐंगे। आरोग्य विभाग को बोलकर तो पता चलेगा बुखारो से डेंग्यु से, मलेरीया से इसने लोग बिमार होते जा रहे है इसका मेहज कारण एक ही है आरोग्य विभागद्वारा कोई भी इसपर कोई भी नियंत्रण नही है। दुसरी बात अभी आरोग्य विभाग के द्वारा सुखा कचरा गिला कचरा द्वारा प्रचार किया था। एक अधिकारी को जब यह मालूम नही की, इस वॉर्ड की भुमिका रुपरेखा किस तरीके से बनी हूई है, कौनसी गली है, कौनसा मोहल्ला है प्रत्येक वॉर्ड को उन्होंने एक बॅनर बनाके दिया है की, यह बॅनर आप लगाईये और जागृतता लाईये। अभी मै आपको मेरे स्वयं की वॉर्ड के बारे मे बताता हूँ ६ भागो मे डिवाईड है, एक बॅनर कहाँ लगाया जाएगा? लोगो मे जागृतता कैसी लाई जाएगी? अधिकारी को कहाँ तो उन्होंने कहाँ की, हमको प्रत्येक वॉर्ड के अंदर एक एक बॅनर बांधने को कहाँ गया है। यह बॅनर कहाँ लगाये वह हमको बताइये। आप बताईए लोगो मे जागृतता कैसी लायेंगे। आरोग्य विभाग के बारे मे स्थिती बहोत ही खराब है, कोई भी अधिकारी ध्यान नही दे रहा है। आपको थोडासा पार्श्वभुमी पर ले जाता हूँ। यहाँ उत्तन मे डंम्पिग ग्राऊंड के उपर बहोत बडा आंदोलन हुआ था। परसो की बात है वहाँपर एक मय्यत का कार्यक्रम था। पिछले चार बरसो के अंदर ऐसी दुर्गंध कभी नही आयी थी जितनी दुर्गंधी उसदिन आ रही थी। लोगो के दम घुटने लगे थे, एकदम उलटीया तक होने लगी थी। मैने शिंदे साहब, से कहाँ पानपट्टे साहब से कहाँ यह क्या होता है उस समय मे कोई भी अधिकारी वहाँपर जाकर मौजूद होकर उस चिज की पाहणी करते नही है। स्थिती वापर ऐसी बनती जाएगी, वॉर्डो की साफसफाई नही हो रही है, वहाँ की दुर्गंध ऐसी होती जा रही है, मलेरीया का प्रकोप बढता जा रहा है। आरोग्य विभाग के अधिकारीयों को बार-बार कहने के बाद शिंदे साहब, कांबळे साहब, इनके उपर कोई भी फरक नही पड रहा है की जाकर पाहणी करे। खाली ऑफिस मे आकर बैठ जाऐंगे, वॉर्ड मे जाकर देखते नही है, कहाँ कचरा पडा है, कहाँ दुर्गंध फैली है डंम्पिंग ग्राऊंड की स्थिती क्या है? एक ही आदमी पवार जो एस.आय. है उनकी नियुक्ती मेरे वॉर्ड मे की गई है की आदमी उत्तन का डंम्पिंग ग्राऊंड देखता है। साहब उत्तन के डम्पिंग ग्राऊंड की अवस्था बहोत खराब है। वह व्यक्ती मुझे बताईए पिछले दर्जे का अधिकारी हमारे वॉर्ड को मेन्टेन नही कर पा रहा है वह वहाँ पे कैसे मेन्टेन करेगा? स्थिती भयानक है निर्णय आपको लेना है की, शहर के अंदर आरोग्य की व्यवस्था हम लोगों को कैसे उचित दे पायेंगी?

**स्नेहा पांडे :-**

मा. सभापती साहब, कमिश्नर साहेब आपकी परमिशन से बोलती हूँ। अभी अभी सन्मा. सदस्य शर्मा साहब ने जैसे बताया की, कचरे के वजह से मिरा भाईंदर की हालत बत से बत्तर होते जा रही है। लेकीन घरके कचरे फिर भी उठाये जा रहे है जैसे तैसे बिल्डींग के कचरे ३ महिने से मेरे वॉर्ड मे २ जगह पे इंडस्ट्रीयल गाले है जहाँपर बफिंग के काम होते है, लेकीन पिछले ३ महिने से उठाये नही जा रहे है जहाँ ओपन स्पेस है वही पर बफिंग वाले अपने गाले से कचरा लाकर लगा देते है। आपके पास इस विषय को लेकर

बैठे थे सभी लोग तो इस तरह की स्थिती हो गयी है की, वॉर्ड मे हर जगह कचरे का ढिग ही दिखाई दे रहा है। तो बफिंग के कचरे क्यो नही उठाये जा रहे है। इसका मै खुलासा चाहती हूँ।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, साहेब वस्तुस्थिती बरोबर आहे हे ठेकेदार वर्षानुवर्षे तेच ठेका करतात. ते चांगली साफसफाई करत नाही त्यांची मिटींग घेतली त्यांना वारंवार सुचना देऊन सुद्धा जवळपास आपण ५४ लाख रुपये दंड वसुल केला आहे. ५० वेळा त्यांना नोटीस दिलेली आहे. जाणून बुजून त्यांना नविन टेंडर मिळालं नाही त्याच्या अटीशर्तीत बसत नाही. जाणून बुजून वेटीस झाल्या आहेत आम्ही लवकरात लवकर नविन प्रस्ताव अटीशर्ती टाकून नविन निविदा आज काढणार आहोत. नविन निविदा ८ दिवसानंतर फायनल झाल्यानंतर असा प्रश्न राहणार नाही ही वस्तुस्थिती आहे ते मी मान्य करतो.

**भगवती शर्मा :-**

साहब, प्रश्न ऐसा है की, एक अधिकारी आप उनके मुख्य अधिकारी होंगे मुझे वह मालुम नही आपको क्या पोस्ट दि है क्या नही। लेकीन एक अधिकारी जैसे शिंदे साहब हैं, शिंदे साहब के नीचे पवार साहब है। प्रत्येक वॉर्ड मे सुबह घुमे तो मेरा दावा है किसी वॉर्ड की कम्प्लेंट मे भी बोला था। आप ठेकेदार पे डालते है की, उसे दंड वसुल लिया। आपके रहते हूए अगर वह वहाँपर आकर उस कचरे को साफ नही करता है तो वहाँपर आकर उधर से कचरा उठाकर साफ नही करता है। ऐसा हो ही नही सकता है। साहब आए थे उसदिन मुझे बहोत बडी खुशी हुई थी की, इस शहर मे झाडु मारते है झाडु मारकर मट्टी साईड मे करते है उनकी थर एक एक फुट तक हो गयी थी। पहले नियम क्या था ब्रश मारते थे फिर पावडर से निकालते थे, साहब आये तबसे मैने देखा ८ दिन तक जेसीबी मशिन लगाके वह कचरे साफ करे। ब्रश मारे गये कचरा जहाँ जहाँ कोने कोपचे मे थे, मिट्टी थी जो भी थी सबको उठाया क्यो उठाया गया? तब यह कॉन्ट्रॅक्टर नही थे। तब आप अधिकारी नही थे? जागृतता आप लोगों से...........

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेब आता ते त्यांच्या वॉर्डातल सांगतात की पूर्ण मिरा भाईंदरच सांगतात मिरा भाईंदर शहर के अंदर कॉन्ट्रॅक्टर के माध्यम से इस तरह से काम कभी हुआ नही। पानपट्टे साहब भी बात बोलते है ना वह सही है। जब काम करनेवाला अधिकारी जाके १२ घंटा उधर खडा रहा लेकीन काम करनेवाले के कर्मचारी नही है, अवजार नही है, वहाँपर कोई जबाबदारी आदमी नही रुकता तो अधिकारी ५ अधिकारी भी भेजोगे ना। तो मै बोलता हूँ अधिकारीयों से काम नही होने वाला अधिकारी कब काम करेगा कॉन्ट्रॅक्टर का अवजार रहेंगे कर्मचारी रहेंगे, सबकुछ वहाँपर उपलब्ध रहेगा तभी काम होगा। मा. सभापती साहेब, आपल्याला वस्तुस्थितीवर बोलायचं आहे की, हे म्हणतात त्या पध्दतीवर बोलायच आहे. आपल्याला जी स्थिती आहे ती बोलायला लागेल. कुठल्याही अधिकारी नेऊन २५ एक जरी उभे केले, अधिकारी ब्रश मारणार आहे का? अधिकारी झाडु मारणार आहे का? अधिकारी कचरा भरणार आहे का?

**(सभागृहात गोंधळ)**

**भगवती शर्मा :-**

मै अपने वॉर्ड की बात कर रहा हूँ। आपने किस झोन के अंदर किस ठेकेदार को दिया है? आप उनके ठेकेदार ने क्या किया वह उनको जवाब दिजिए। मै मेरे वॉर्ड की बात कर रहा हूँ। और मै दावे के साथ बताता हूँ। उस समय के अंदर साफसफाई हूई इतिहास मे कभी नही हूई। वापस क्यो नही हो पा रही है?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य शर्मा साहेबांनी आणि जंगम साहेबांनी जो विषय काढला ते दोन्ही विषय फार सिरीयस विषय आहे. मिरा भाईंदर मध्ये सध्या कशी स्थीती आहे? आमच्याकडे २४ कॉन्ट्रॅक्टर आहेत त्यांच्याकडे आमचे एरीयाज वाटून दिलेले आहे. पण टेंडर काढताना दोन अटी टाकल्या पाहिजे होत्या त्या अटी टाकल्या नाहीत. त्याच्यामध्ये प्रमुख अटी अशी होती की किती कर्मचारी तुमच्याकडे असले पाहिजे? तुमच्याकडे किती वाहने असले पाहिजे ह्या अटी त्या टेंडर कंडीशन मध्ये नव्हते म्हणून त्यांच्याकडे किती कर्मचारी असले पाहिजे किती वाहने असले पाहिजे हे काही निश्चित नाही. आता टेंडरची मुदत मार्च मध्ये संपली होती. नंतर नविन टेंडर काढण्यात आणला होता. आजपर्यंत टेंडर फायनल नाही झाला. त्याच्यावर मध्ये कोर्ट केस पण झाला कोर्ट केसचा निकाल आलेला आहे. परंत टेंडरची प्रोसिजर सुरु होत आहे. पण आपलं म्हणनं बरोबर आहे की, अधिकाऱ्यांनी थोड फिरलं पाहिजे. अधिकाऱ्यांचं सुपरविजन थोड कमी पडते. त्यांनी सुपरविजन वाढवलं पाहिजे. या विषयावर आम्ही मागच्या आठवड्यामध्ये मिटींग घेतली होती. मिटींगमध्ये पूर्ण मिरा भाईंदरला ठराविक एरीयाज मध्ये वाटून दिलेलं आहे आणि प्रत्येक एरीयाचा मुकादम आणि सॅनिटरी इन्स्पेक्टर यांची जबाबदारी फिक्स केलेली आहे या विषयावर आज दुपारी सगळ्या मुकादम यांची मिटींग बोलवली आहे. आमच्याकडे सध्या ६०-६२ मुकादम आहे. त्या सगळ्यांना आज दुपारी मिटींगसाठी बोलवलं आहे. नंतर ५.०० वाजता सगळ्या कॉन्ट्रॅक्टर ला मिटींगसाठी बोलवलं आहे. हा विषयावर तुमचं म्हणनं बरोबर आहे. फार गंभीर आहेत डेंग्यु, मलेरीया, किंवा इतर प्रकारचे आजार आहेत त्याचे हेच सिजन आहेत. पावसाळ्यानंतर हे सगळे आजार पसरतात. लोकांना त्रास होतो आणि नगरपालिकेचं फार नाव खराब होते. तसेच कोणत्याही शहरासाठी साफसफाई फार महत्वाची असते. दुसरा विषय जसं पानपट्टे साहेबांनी सांगितलं की, नविन टेंडर प्रोसिजर

आम्ही सुरु करतो. मागच्या आठवड्यामध्ये आम्ही टेंडर काढला होता. कोणत्याही कंपनीने त्याला प्रतिसाद दिला नाही आता आज आम्ही परत टेंडर काढणार आहोत. त्याचा ठराविक एक असते ती देणार आणि आशा व्यक्त करतो, अशी उम्मीद व्यक्त करतो की, एखादी चांगली कंपनी किंवा मोठी कंपनी येऊन हे टेंडर घेतील आणि हे ज्या अडीअडचणी समोर येतात ते पुढच्या वेळेला येणार नाही. या वेळेला टेंडर काढताना आम्ही त्याच्यामध्ये ठराविक म्हणजे किती लोक तुम्हाला पाहिजे किती वाहन तुम्हाला पाहिजे. हे सगळे त्याच्यामध्ये नमुद केलेलं आहे. मागच्या टेंडरला ज्या अटीशर्ती नव्हती की इतके लोक तुमच्याकडे असले पाहिजे, इतके वाहन असली पाहिजे. तशी चुक यावेळेला राहीलेली नाही. या टेंडरला एक रोड साफ करण्यासाठी किती लोक लागणार आहे. ते फिक्स करुन त्याला दिलेलं आहे. किती वाहन लागणार आहे ते फिक्स करुन दिलेलं आहे. तिसरा विषय आपण उत्तनचा काढला उत्तनमध्ये जे डंपिंग ग्राऊंड आहे. लँडफिल साईट आहे. तिकडचा विषय आपलं म्हणणं परत बरोबर आहे. स्थिती फार वाईट आहे. ते कॉन्ट्रॅक्टर हेंजर बायोटेक आहे त्यांना सुद्धा मी शो कॉज नोटीस या विषयावर काढलेला आहे. साहेब, मी यावेळेला सांगु इच्छितो की, लँडफिल साईट ला एक नियमावली आहे. एम.एस.डब्ल्यु. २००० असं महाराष्ट्र स्टेट सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट रुल २००० अशा प्रकारची नियमावली आहे. त्याप्रमाणे ती लँडफिल साईट मेंन्टेन झाली पाहिजे. पण काही कारणामुळे कॉन्ट्रॅक्टरची अक्षमता असेल किंवा अजून काही अडचणी असेल तसा होऊन नाही राहील्या म्हणून त्यांना आम्ही शो कॉज काढला आहे. त्यांच्या कामात सुधारणा झाली नाही तर त्यांच्याबद्दल काय कारवाई करायची आहे त्याच्यावर निर्णय आम्ही घेऊ जे एमएसडब्ल्यु नियम आहे. त्याप्रमाणे वाससाठी त्यांनी सगळे वास ट्रॅप केली पाहिजे. म्हणजे वास पसरली नाही पाहिजे त्यांना ट्रॅप केलं पाहिजे. तसा पण याच्यामध्ये एक नियम आहे मी स्वतः त्या साईडला गेलो होतो. तिकडे वास येत आहे. सगळ्यांना माहित आहे की, तिकडची स्थिती खराब आहे ते इंम्प्रुव्ह करण्याची गरज आहे. सुधारण्याची गरज आहे त्यासाठी सुद्धा आमचे प्रयत्न सुरु आहेत. मी आपल्याला हे सांगु इच्छितो आणि आजच्या दिवसाची जी स्थिती आहे त्याच्यात निश्चित सुधार होईल अशी मी आशा व्यक्त करतो.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

साहेब, तुमच्या माहितीसाठी एक सांगतो की, आमचा प्रत्येक प्रभागामध्ये जे मजूर वर्ग पाठवले जातात साफसफाई करण्यासाठी ती एक संख्या निश्चित केलेली असते की, एका प्रभागाला १५ किंवा २० माणसं असं ठरलेलं असते. पण त्याच्यामध्ये ५ ते ६ माणसं कामाला येतात.

**मा. आयुक्त :-**

साहेब, मी तेच तुम्हाला सांगितलं की, मागच्या टेंडरमध्ये संख्या निश्चितच नव्हती.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

५ ते ६ माणसं कामाला येतात. आपण त्या विभागाच्या सॅनिटरी इन्स्पेक्टरांना विचारणा केली तर तो सांगतो आज गणपती आहे, आज माणसं रजेवर आहेत. आज आले नाही आणि जर विचारणा केली नाही तर त्यांची हजेरी पूर्ण लावली जाते. आम्ही त्यांना पेमेंट करतो ना. त्या कॉन्ट्रॅक्टरला आपण पेमेंट करतो. १५ माणसाचं दिवसाच पेमेंट आपण करतो. आणि प्रत्यक्षात ७ ते ८ माणसं कामाला येतात मग, आठ माणसाचं पेमेंट आपण फुकटचं देतो. तर त्याच्यावर नियंत्रण पाहिजे. विभागीय अधिकाऱ्यांच कोणाच लक्ष नसतं. कोणी त्याच्याकडे बघत नाही. वॉर्डमध्ये साफसफाई होत नाही. तुम्ही मिरारोड मध्ये फिरलात तर तुम्हाला दिसुन येईल. रस्त्याच्या मधोमधच जागा नाही, कचरा पेटी नाही. कचरा पेटी नसल्यामुळे संपर्ण जिथून कचरा येतो त्या एकाच ठिकाणी रस्त्यावर टाकतात. मग, काही विरोधी पक्षाचे लोक आहेत. मग त्या वॉर्डामध्ये फोटोग्राफी करतात आणि टी.व्ही. ला दाखवतात की बघा यांच्या वॉर्डामध्ये किती कचरा पडलेला आहे. साफसफाई होत नाही नगरसेवक काम करत नाही. याला दोषी आम्ही ठरतो. नगरपालिकेचे लोक काम करत नाही. आम्हाला एकच सांगायचं आहे की, माणसं बरोबर काम करत नाही मध्ये असं ठरलं होत की आरोग्य विभागातर्फे सांगण्यात आलं होत की, प्रत्येक वॉर्डचे जे मुकादम आहेत त्यांनी जाऊन नगरसेवकांना विचारलं पाहिजे की, तक्रार काय आहे? कुठे काय आहे? ते आम्हाला द्या. बुक मेंटेन करा ती पध्दत बंद का केली? आणि मुकादम पण विचारायला येत नाही. कॉन्ट्रॅक्टरवाले पण येत नाही आणि नगरपालिकेचे मुकादम आहेत ते पण विचारायला येत नाही. आरोग्य विभागाचं यांच्याकडे बिलकुल लक्ष नाही. आज तुम्हाला सांगतो की, कांबळे साहेब असो किंवा शिंदे साहेब असो तिथे कोणी लक्ष देत नाही. त्यांनी ऑफिस मध्ये न बसता एक फेरफटका मारला तर त्यांच्या लक्षात येईल की कुठे कुठे किती कचरा आहे आणि किती दुर्गंधी पसरली आहे ती. पण तसं काही होत नाही. तर याच्यावर एकतर विभागीय सॅनिटरी इन्स्पेक्टर नगरपालिकेचे आहेत. त्यांच्यावर काहीतरी प्रेशर आणलं पाहीजे. तरच हे काम होईल कोणीही विचारायला चौकशी करायला सुध्दा येत नाही आम्ही ज्यावेळेला दहा फोन लावतो फोन उचलत नाही. मग आम्ही शिकायत कोणाकडे करायची? साहेब, आपण लक्ष द्या.

**मा. आयुक्त :-**

आपलं म्हणणं बरोबर आहे मी मगाशी जे काही सांगितलं त्याच्यामध्ये असं नमुद केलं होत की, मागच्या टेंडरमध्ये किती माणुस असलं पाहिजे? किती लोक असली पाहिजे ते नमुदच केलेलं नाही म्हणून पेमेंट जे होतं ते लोकांवर होत नाही ते फिक्स पेमेंट आहे तस होतं. आपण म्हणणं आहे की, निरीक्षण कमी पडते कुठे-कुठे सुपरविजन कमी पडते हे आपलं म्हणणं मी मान्य करतो आणि या विषयावर अजून लक्ष देऊ. आणि आम्ही मिरा

भाईंदरमध्ये फोन नंबर सुरु करतो मी याची सुचना दिलेली आहे. कुठे ही कचरा उचलला नाही त्या फोनवर फोन करायचा आहे आणि संध्याकाळी त्याच्यावर दखल घेण्यात येईल.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेब, माझं असं म्हणणं आहे की, जे या सगळ्या गोष्टी आपण अधिका-यांना बोलतो की, ते बरोबर काम करत नाही. सुपरविजन बरोबर होत नाही. हे होत नाही ते होत नाही. त्याच्यापलिकडे जाऊन आपल्याला जो कॉन्ट्रॅक्टर आहे तो सगळ्या बाजूने काम करण्यासाठी सक्षम नाही. हा महत्वाचा मुद्दा आहे. तिथे जर व्यवस्थित असेल ना ज्याच्याकडे अवजार आहे कर्मचारी असतील. त्याच्याकडे अनुभव असेल ज्याची तेवढी मोठी यंत्रणा असेल तोच ते काम करु शकतो. कुठल्यापण माणसाला तिथे नेमला तर बाकीचे सक्षम असताना सुद्धा ते काम करु शकणार नाही करण्याचा लायकच नसेल तर काय करून घेणार? तुमच्या हाताखाली एक अधिकारी आहे. पण, तुम्ही त्याला दहा वेळा समजवलं असेल जर त्याला समजतच नसेल त्याची ती कुवतच नसेल तो ड्युप्लिकेट सर्टीफिकेट घेऊन भरती झाला असेल तर तो तुम्हाला काम करुन देणार नाही कारण त्याच्याकडे तो अनुभव नाही तो त्या क्षमतेचा नाही म्हणून जे कॉन्ट्रॅक्टर सुरुवातीला आपण नेमतो तिथून आपली सुरुवात व्यवस्थित असेल तर यापूढे अडचणी निर्माण होणार नाही.

**मा. आयुक्त :-**

अगदी बरोबर आहे. जूना करारनामा संपलेला आहे. आता नविन कराराची वेळ आहे. नविन करार करताना आपलं जे म्हणनं आहे ते लक्षात घेऊनच करणार.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, त्याच्या मध्ये आणखीन असं एक नमुद करा की, ज्या वॉर्डचे नगरसेवक असतात ह्या तक्रारी नगरसेवकांच्याच जास्त असतात की, आमच्या वॉर्डमध्ये साफसफाई नाही त्याच जे बिल पेमेंट केलं जात ना प्रत्येक महिन्याला नगरसेवकांनी त्यांच लेटर दिलं पाहिजे की स्वच्छता व्यवस्थित आहे नाहीतर हेच नगरसेवक आम्हीच पुढच्या मिटींगला बोलणार की, साफसफाई होत नाही. मी कोणत्या ठेकेदाराच्या बाजूने बोलत नाही किंवा त्या अधिका-याच्या बाजूने पण बोलत नाही कुठेतरी लगाम लागला पाहिजे स्वच्छ असलं तरच त्याचं बिल काढलं तर तो स्वच्छता करेल ना बिल नाही काढलं तर तो बरोबर समजेल की, नगरसेवकानं आपल्याला बिल नाही स्वच्छता नाही तर त्या नगरसेवकाला बोलण्याचा काही हक्क राहणार नाही.

**मा. सभापती :-**

तुम्ही जे बोलता मध्ये माझ्याकडे ठेकेदारांच्या अशा कंम्प्लेंट आल्या जर लेटर दिलं तर आमच्याकडे बोलतात की आम्हाला काहीही द्या. नगरसेवकांची डिमांड चालू होतात ही सिस्टम तुम्ही करता ती बरोबर आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, मी पैशाचं बोलत नाही तो त्या टाईमाला बोलायला पात्र नसेल जर साफसफाई केली असेल तर बोलायला पात्र नसेल. स्वच्छता केली आहे तर लेटर दिलं आहे. व्यवहार होऊ दे नाही होऊ दे त्याच्याशी लेनदेन नाही. साफसफाई नक्कीच होत नसेल. मिरा भाईंदर महापालिका जी खर्च करते ते व्यर्थ आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही चांगली शंका व्यक्त केली तुमच्याकडे चांगली तक्रार आहे तर म्हणण्याचा उद्देश असा की, नगरसेवकांचं लेटर घेतल किंवा देणं कम्पलसरी केलं तर काय अडचण आहे ते तुम्ही सांगितलं त्याच्यापलिकडे जाऊन की, नगरसेवकांची तक्रार असेल तर त्यांनी जरुर आयुक्त साहेबांकडे करावी. स्टँडींगला करावी. मा. महासभेमध्ये करावी जर असं वाटत असेल की, मी माझ्या वॉर्डाची तक्रार करतो, तर दोन अधिकारी जाऊन संयुक्त रित्या त्याची पाहणी करतील ना. शहानिशा होईल. आमचं म्हणणं खरं आहे की खोट आहे हे दोन अधिका-यांनी जाऊन बघितलं तर वस्तुस्थिती कळेल चांगल असेल तर चांगल म्हणतील चुकीचं असेल तर चुकीचं म्हणतील जो आपला विषय आहे तेवढाच आपण घ्यावा जो अधिका-यांचा विषय आहे तो आपल्याकडे घेण्यात अर्थ नाही ते त्यांनी त्यांच्या लेवलवरती करावं.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, यह भी टेंडर जब दिया था ना तब आपके जानकारी के लिए सुचना देता हूँ। जब यह टेंडर दिया था तभी वॉर्ड व्हाईज जो कर्मचारी नेमने का बोला था नियुक्ती करनेका १५-२० सबको युनिफॉर्म, उसको फोटो के साथ कार्ड क्या होता है जहाँ सफाई रहती है तो इस वॉर्ड का दुसरे वॉर्ड मे जाता है। सब जगह एकही चेहरा दिखाई देता है। सब २००२ मे २००३ तक मैने खुद हाजरी लगाया था की कितने कर्मचारी है जो एरीया मे ३०० कर्मचारी है उसमे १५० लोगों की साईन होती थी और जो दुसरा रजिस्टर है उसमे ३०० आदमी का पगार लेनेका मतलब १५० आदमी का पगार ऐसे जाता है। यह सबसे बडा भ्रष्टाचार है आरोग्य मे निकलना जरुरी है तब शहर की साफसफाई होगी मेरे पास अभी भी रजिस्टर पडा है। मा. सभापती साहब ने बताया ना वही है। शिवमुर्ती नाईक साहब थे तभी यह खुद घुमके वह भ्रष्ट्राचार को उन्होंने हात मे लिया और बंद करने का काम किया था। वह आपको अभी करना पडेगा तब यह होगा।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. यावेळेला रजिस्टर नव्हत तर हजेरीचा प्रश्नच नव्हता याच्या पूर्वीचा हा विषय होता. त्यावेळेला माझ्याकडे चार्ज होता. यावर्षी फक्त ७००-८०० कर्मचारी आहेत.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेब, त्यावेळेला आम्ही हे कर्मचारी आहे तसेच राहू द्या अशा पध्दतीने भरपूर वेळेला बोललो. बऱ्याच वेळेला आम्ही ही तक्रार केली. आमचे त्यावेळेला आम्ही ही तक्रार केली आमचे त्यावेळचे कमिश्नर बोलले की, तुम्हाला साफसफाई झाल्याशी मतलब आणि सन्मा. सदस्य म्हात्रे सो. मोदी सो. यांच्याकाळामध्ये तो टेंडर गेला आहे तुम्ही त्यावेळेला स्टँडीगचे सदस्य होते.

**चंद्रकांत मोदी :-**

मैने २००२ की बात की है।

**लक्ष्मण जंगम :-**

कर्मचारी नेमले नव्हते ते तुमच्या काळामध्ये असं मी म्हणतो.

**रामनारायण दुबे :-**

मा. सभापती साहब, मा. आयुक्त साहब, यह समस्या साफसफाई के लिए बहोत ज्यादा तरह से उत्पन्न होता है जैसे बिल्डींग के लोग फ्लॅट का रिपेरींग कराते है तो बिल्डींग के नीचे रॅबिट लाकर रख देंगे। रॅबिट के उपर कचरा पडता है इसके बाद प्रभाग कार्यालय से नोटीस दि जाती है की, अगर कचरा नही उठाओगे तो मै फाईन मारुंगा। फाईन लगता है फिर भी फ्लॅटवाले नही उठाते है और महानगरपालिकावाले भी नही उठाते। रॅबिट रहता है तो कोई भी वहाँपर कचरा फेकेगा। ऐसे स्थिती मे उनके उपर डेबिट मारा जाता है तो महानगरपालिकेका कर्तव्य होता है की उस कचरे को उठाये। अधिकारी को बोला जाए तो बोलते है की हम नही उठाऐंगे। डेबिट मार रहे है तो रॅबिट उठाना चाहीए।

**राजेश म्हात्रे :-**

साहेब, आपण ठेकेदारांच ॲग्रीमेंट बनवतो त्यामध्ये कचरा, रॅबिट वगैरे उचलण्याची अट आहे. ते लोक कचरा उचलतात. रॅबिट उचलण्यासाठी थेट जाऊन पैसे लावतात.

**भगवती शर्मा :-**

जो टेंडर हुआ था उसमे रॅबिट की अट नही है।

**रामनारायण दुबे :-**

महानगरपालिका जब डेबिट मारती है सोसायटी के उपर तो वह महानगरपालिका को उठाना चाहीए ना।

**राजेश म्हात्रे :-**

रॅबिट उठानेका पैसा मांगते है।

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ७८ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. ६७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आरोग्य विभागाच्या खालील कामांना मा. आयुक्त सो., यांनी मंजुरी दिलेली आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | कामाचा तपशिल | एकुण देय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मे. रमेश ॲग्रोकेम कार्पोरेशन कंपनी | Pyrosene Oil - E | रु. ९,४५,७५०/- |
| २ | मे. स्पाईक पेस्टोकेम प्रा.लि. | Cyphenothrin 5% EC Gokilaht S-5 EC | रु. ९,५०,०००/- |
| ३ | मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन | Deltamethrin 2.5% Flow | रु. ९,४८,५००/- |
| ४ | मे. स्पाईक पेस्टोकेम प्रा.लि. | प्लास्टिक स्प्रे पंप (१६ लिटर क्षमतेचे) | रु. १,२३,०००/- |
| ५ | मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन | Pyrosene Oil - E | रु. ८,००,०००/- |
| ६ | मे. स्पाईक पेस्टोकेम प्रा.लि. | Bio Larvicide, Vectobac 12 AS | रु. ८,७०,०००/- |
| ७ | मे. आशापुरा कन्ट्रक्शन कंपनी | १९ टक्के रिजेक्ट मटेरियल उचलणे कामी डंपर व पोकलन मशिन पुरवठा | रु. १०,००,०००/- |
| ८ | मे. लक्षता ट्रेडींग कॉर्पोरेशन | झिंक फॉस्फाईड केक व डि.डि.वि.पी ७६% इ.सी. | रु. ६,५०,०००/- |
| ९ | मे. गणेश डेव्हलपर्स | एन.पी-३ आर.सी.सी. पाईप पुरवठा करणे | रु. २,५०,०००/- |

उपरोक्त अ.क्र. ०१ ते ०९ या कामांचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७९, मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (संगणक विभाग) मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विविध विभागांना संगणक खरेदी करणेबाबत. प्रकरण क्र. ८०, मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (संगणक विभाग) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्वतंत्र संकेतस्थळ (Website) बाबत मा. स्थायी समिती सभेत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**शशिकांत भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, याच्यामध्ये माझी एक सुचना आहे अवलोकन ८० वर आपण जे १२ अटीशर्ती दिलेल्या आहेत काय काय करायच्या आहेत.

**भगवती शर्मा :-**

साहब प्रकरण क्र. ७९ मे गोषवारा मे दिया है की, सदर निविदा उघडायचे अथवा नाही मतलब पहले तीन आया था फिर उसके बाद तीन आया। सदर मिरा भाईंदर महानगरपालिका संगणक विभागाने खालील विभागासाठी संगणक पूरवठा करणे कामी दि. २४/०२/२०११ रोजी प्रथमतः निविदा ई-टेंडरिंग संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यांत आली होती.

| अ.क्र. | विभागाचे नाव | नग |
|---|---|---|
| १. | पाणी पुरवठा विभाग | १५ |
| २. | सार्वजनिक बांधकाम विभाग | ४ |
| | **एकुण** | **१९** |

त्यानुसार दि. ०३/०३/२०११ रोजी दु.१.०० वाजेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. परंतू त्यावेळी प्राप्त निविदेचे दर शासनाचे दरकरार पेक्षा जास्त आले असल्याने फेर निविदा दि. १९/०५/२०११ रोजी प्रसिद्ध करण्यांत आली होती. फेर निविदेची अंतिम मुदत दि. ३०/०५/२०११ रोजी दु.१.०० वाजेपर्यंत होती. त्यानुसार निविदेमध्ये फक्त १ निविदा धारकाची निविदा प्राप्त झालेली आहे.

सदर निविदा उघडावी अथवा नाही अथवा शासन दर करारनुसार संगणक खरेदी करावेत, याबाबत मा. आयुक्त सो यांना सादर केले असता मा. आयुक्त सो यांनी फेरनिविदा काढणेकरिता होणारा वेळेचा अपव्यय व खर्च विचारात घेता शासन दर करारानुसार (DGS & D/महाराष्ट्र शासन IT Dept) खरेदी करणे बाबत मंजूरी दिलेली आहे. महाराष्ट्र शासनाच्या दर करारामध्ये खालील तपशिलाप्रमाणे ब्रँड उपलब्ध आहेत.

| Sr.no. | Item No. | Item Description | Make | Price per unit |
|---|---|---|---|---|
| 1. | AO2W | High end PC intel processor & Window Preloaded Windows 7 Professional 64 bit with Certificate of Authenticity recovery/ restore media CD along with patches and updates for 3 years. Preloaded McAfee/Quick Heal/MS Security essentials Antivirus along with patches & updates for 3 years.<br>Acer – Vertion M 200 Series<br>Intel Core$^{TM}$ I3-550 Processor @3.2 GHz<br>Intel H57 / Inetl Q57<br>OEM Motherboard with 2 PCI, PCI Express X 16 downward compatible to PCI Express X1, 1-Seriel,1RJ45, 1-VGA,4-USB, Line in line out, mic, integrated graphics and sound device.<br>18.5" Wide TFT 1024X768, Above TCO 03 Certified, Monitor of the same make of offered PC brand<br>4 GB DDR3 SDRAM @ 1066 MHz expandable to 8 GB Min, 1 DIMM Slot free for Future upgrade @ 320 GB SATA HDD @ 7200 rpm<br>Integrated 10/100/1000Mbps Gigabit LAN with Wake On LAN Support, ONE | Acer | 29,178/-<br>(Excluding taxes) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | Serial port, Min 4 USB 2.0 port of which at least two should be on front side, 1-Parallel, 2 PS2, 1 RJ45, 1-VGA,2 Line in (Stereo/micro phone); 2 Line – out (headphone / Speaker ) Heavy duty Bi-Ligual (INSCRIPT)Etched Membrane Keybord & Optical Mouse DVDRW | | |

एकुण १९ संगणक खरेदीसाठी रु. ५,५४,३८२/- (अधिक कर) खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त प्रस्तावास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये अवलोकनार्थ मा. स्थायी समितीस सादर. तो प्रश्न यह उठता है की एक निविदा आयी थी तो वह खोला क्यो नही? हो सकता है उसमे कम दर आती अगर उसमे कम दर आती उसमे भी ज्यादा भी तो शासन की जो रेट ठहराई है उसके हिसाब से देते या फिर वापस फेरनिविदा निकालते ऐसे कई मुद्दे आये है की, एक एक बार नही दो-दो बार फेर निविदा निकाली है। या तो आवश्यक होगा तो उस हिसाब से डिसीजन लेते। इसमे ऐसा क्या कारण हुआ था?

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये असं महत्वाचं आहे की, एकच निविदा आली होती आणि कॉम्पिटीशन फेअर नव्हती. दुसरी परत निविदा देणार परत जाहीरात देऊन निविदा मागवणार याच्यामध्ये वेळ जात होता म्हणून हे केलं होत स्टँडींगची म्हणनं असेल तर मी एक निविदा उघडू शकतो. स्टँडींगचं म्हणणं असेल की एक निविदा उघडा कंम्पेर करा तर तसं करु शकतो.

**भगवती शर्मा :-**

साहेब, ती एक निविदा उघडून कम्पेर करुन द्या ना तशी माझी सुचना आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, अवलोकन ८० वर बोलतो शेवटी १२ अटीशर्ती त्यांना सांगितलं की आपण इंन्फॉर्मेशन्स अटॅच करुन वॉरंटी पर्यत १२ आहेत. त्याचं एल.बी.टी. लाईन ऑनलाईन मध्येच जमा करावा. ही नाव त्याच्यात जन्म-मृत्यु ऑनलाईन मिळायला पाहीजे याची नोंद घ्यावी. जो दुकानदारांना परवाना देतो तो ही ऑनलाईन मध्ये लावा. तक्रार नोंद असते ती पण ऑनलाईनमध्ये करावी ही चार मुद्दे त्याच्यात नमुद करावे मी प्रशासनाची एक चुक सुधारु इच्छितो की आपण नियम अधिनियम बरोबर देता पण त्याच्या पुढचं दाखवा ना की "ब" मध्ये "ड" मध्ये प्रकरण ५ मध्ये आहे. पुढचं काय दिलं प्रकरण ५ पण अ,ब,कड, कोणता आहे की नाही? त्याच काहीच देत नाही. फक्त प्रशासन आमची दिशाभुल करते की, काय? मी नियम दाखवून वाचणार की नाही यस बोलले आणि चालले प्रशासनामध्ये सुधार आणायला पाहिजे की आपण कधी नियम देतो की कलम देतो पोटनियम (२) बरोबर दिलेलं आहे. पण त्याच्यात अनुसुची प्रकरण "ड" आहे ते त्यांनी दिलं नाही. प्रशासनाने याच्यामध्ये सुधारणा करावी देताना सविस्तर माहिती द्या कारण कोणीही स्थायी समितीचे नविन सदस्य असतील तो नियम कुठे आहे तो त्याला माहित नसेल ज्यांनी गोषवारा दिला त्यांनी खुलासा द्यावा अशी चुक का झाली?

**राजकुमार घरत :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम प्रकरण क्र.५ नियम (२) पोटनियम २ मध्ये प्रोव्हिजन आहे की, निविदा न मागविता संविधा करण्याची प्रोव्हिजन आहे.

**शशिकांत भोईर :-**

ती प्रोव्हीजन आहे ती मी वाचली पण अनुसुची "ड" का प्रमाणे ते प्रकरण आहे. प्रकरण अनुसुची "ड" ५ असं आहे तो. नुसतं प्रकरण नियम (५) नाही आहे. अनुसुची "ड"

**भगवती शर्मा :-**

आपने इसका टेंडर क्यो नही निकाला?

**मा. आयुक्त :-**

इसका एक कारण है की, वेब साईट डिझाईन करना एक घर करने के जैसा है। जैसे आप घर डिझाईन करते हो वैसे वेब साईट डिझाईन करते है। कोणीही माणूस येऊन सांगु शकतो की, मी वेब साईट डिझाईन करु शकतो, तुम्हाला आवडणार की नाही तो नंतरचा विषय आहे. त्याच्यामध्ये असं नाही आहे की १ वेब साईट चे १०० रुपये आहे. ते एक डिझाईन सारखं आहे. डिझाईनची बाब आहे. म्हणून आमच्याकडे दोन प्रस्ताव आले होते. एक एबीएम चा आला होता आणि एक मॅस्टेक चा आला होता. मॅस्टेक च डिझाईन सध्या गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्राची वेब साईट आहे तो सुध्दा मॅस्टेक ने डिझाईन केलेली आहे. ती चांगली डिझाईन केलेली आहे. त्याच्याकडे अनुभव आहे म्हणून त्यांना दिलेलं आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. सभापती साहेब, मी आपल्यालाएक सुचना करतो. माझ्या वॉर्डमध्ये ईश्वर पुजा म्हणून एक बिल्डींग आहे. ए विंगला टॅक्स २००८ मध्ये लागला. बी विंगचे रहिवाशी त्याचवेळेला बरोबर होते. बी विंग ला टॅक्स लावला गेला नाही. ए विंग ला नियमानूसार टॅक्स लावला. बी विंगला आता शास्ती लावून बिलं पाठवली. हा

प्रकार या ठिकाणी घडला आहे. टॅक्स चे अधिकारी कोण आहे ईश्वर पूजा बिल्डींग मध्ये एका विंगला टॅक्स बरोबर लावला त्याचवेळेला त्यांनी ही मागणी केली की, आमचाही टॅक्स लावा. त्याचवेळेला लोक रहायला आली होती. त्यांचा टॅक्स लावला नाही. नंतर एका विंग ला शास्ती लावून बिल पाठवली. आणि तशी त्यांनी आपल्याकडे सुचना केलेली आहे. लेटर दिलेले आहे. मग ह्याच्यावर तुम्ही आता निर्णय काय घेतलेला आहे?

**दिपक सावंत :-**

जर त्यावेळेची ओसी घेतलेली असेल तर शास्ती लागणार नाही. पाहिजे तर सुनावणी घेतो.

**लक्ष्मण जंगम :-**

ओसी असेल तर असं कसं म्हणता तुम्ही? २००८ नंतर जे अनधिकृत बांधकाम झालं असेल त्याला तुम्ही म्हटलं की आम्ही शास्ती लावणार तुम्ही त्यावेळेला टॅक्स लावायला विसरले राहून गेलं किंवा कदाचित त्या बिल्डरशी काही नातगोत होत म्हणून सोडून दिलं. आणि त्यावेळेला तुम्ही नाही लावलं ते तुमची चुक आणि बाकीच्याला लावून घेऊ म्हणजे? या विषयावर आम्ही तुम्हाला वारंवार सांगितलं आहे. मी आता सुद्धा कमिश्नर साहेबांना सांगितलं की, अजून शेकडो बिल्डींगला टॅक्स लागलेला नाही. ज्यांच कन्स्ट्रक्शन २००८ च्या पहिली आहेत. तुम्ही माहिती घ्या. बिना मिटरचं, बिना लाईटचं कोणी राहिलं नसेल तिकडुन माहिती घ्या आणि कन्फर्म झालं की अगोदर पासून आहे तर त्यांना कशाला शास्ती लावतात.

**दिनेश नलावडे :-**

सोसायटीने सगळी बिलं तुमच्याकडे सबमिट केलेली आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

आज शास्तीचा विषय आला. मागे सुद्धा मी लक्षवेधी घेऊन खुप बोललो होतो. प्लॅन पास बिल्डींग आहे. ग्राऊंड + ५ झाले, ४ झाले सात झाले आणि एखादा टॅरेस फ्लॅट काढला तर पूर्ण बिल्डींगला शास्ती लागते. मागच्या वेळेला आपली बरीच चर्चा झाली ते तुम्ही बघा जेवढा लिगल भाग आहे तेवढ्या वरती नका लावू जे इललिगल केलं असेल त्याला शास्ती लावा. आता ज्या बिल्डींग बांधून झाल्या ओसी सुद्धा काही लोकांनी घेतली नंतर दोन दुकान एक्स्ट्रा बांधली. सगळ्या प्रभाग अधिकाऱ्यांनी आपआपल्या प्रभागामध्ये बघा की, या पध्दतीची काम झाली. साहेब कसं होत की करणारा एक बनला तर बाकीच्या लोकांचा काय दोष आहे? अनधिकृत बांधकाम करणाऱ्याला रहिवाशी रोकू शकणार नाही.

**मा. आयुक्त :-**

नियमाप्रमाणे कसं आहे ते मी चेक करुन घेतो.

**लक्ष्मण जंगम :-**

साहेब, आम्ही पाहिजे तर एक पत्र देतो आज तुम्ही प्रभाग व्हाईज, वॉर्ड व्हाईज कसं तुम्ही चेक करणार आहे किती दिवसामध्ये चेक करुन त्याची माहिती अधिकारी देतील. त्याच ही आम्ही पत्र देतो. भले ३ महिन्याने देऊ द्या. ४ महिन्याने देऊ द्या, ६ महिन्याने देऊ द्या. पण सहा महिन्यामध्ये त्यांनी शोधून काढलं पाहिजे की, किती अनधिकृत बांधकाम झालं २००८ च्या पहिलं मी म्हणत नाही. पण २००८ नंतर झालेल्या बांधकामामध्ये एक्स्ट्रा बांधकाम झालेलं आहे किंवा त्या बिल्डींगच्या शेजारी आगाऊ बांधकाम झालेलं आहे. त्या सगळ्याच्या बाबतीत आम्ही म्हणतो त्याची माहिती घ्यायला सांगा ना होत काय की, एका माणसाने चूक केली आणि बाकीच्या सगळ्यांनी.......

**मा. आयुक्त :-**

तशी कारवाई सुरु केलेली आहे पूर्ण होईल थोड्या दिवसाने

**लक्ष्मण जंगम :-**

धन्यवाद.

**दिनेश नलावडे :-**

साहेब, एकाच बिल्डींगमध्ये टॅक्स लागला अर्ध्या लोकांना आणि अर्ध्या लोकांना नंतर शास्ती लावून पाठवतात ह्याच्यामध्ये संपूर्ण इलेक्ट्रीक ची बिलं वगैरे अगोदर दिलेली आहे. साहेब, जंगम साहेब बोलले की, काही बिल्डर असे आहेत की, ह्यांना केव्हा कोण भेटणारचं नाही कुठल्या बाबतीमध्ये त्याच्यामध्ये ही परिस्थीती आहे.

**मा. आयुक्त :-**

नियमाप्रमाणे कसं आहे ते चेक करुन घेऊ.

**स्नेहा पांडे :-**

मा. सभापती साहब की परवानगीसे बोलती हूँ। मा. आयुक्त साहब मै आपसे निवेदन करना चाहती हूँ की, मिरा भाईंदर शहर मे ऐसे बहोतसे महत्वके काम है जो पास होके टेंडर निकलके पेंडींग मे पडे है। अगर आपको साईड व्हिजीट करना है तो या जैसे भी उसकी परमिशन......

**मा. आयुक्त :-**

यह बांधकाम विभाग का काम है। बांधकाम विभाग के काम इसिलिए शुरु नही हूए क्योकी बारीश है। बारीश जैसे ही खतम हो जाएगी वैसे सब काम शुरु हो जाऐगे।

**स्नेहा पांडे :-**

आपको साईट देखना है तो आप साईट विसिट किजिए। फोटो निकाल के दिखाना है तो बताईए लेकीन जो महत्व के काम है वह हो जाना चाहीए।

**मा. आयुक्त :-**

वह सभी शुरु हो जाऐंगे। बारीश फिरसे शुरु नही हो पाये तो।

**भगवती शर्मा :-**

मा. आयुक्त साहब आप पिछले मिटींग मे नही थे तभी मैने एक सुचना दि थी। जिसके बारे मे मैने आपको एक पत्र भी दिया था। उदाहरण के तौर पर एक एरीया बताता हूँ। भाईंदर वेस्ट मे गीता नगर है। जहाँपर पहले सिरीयल वालो ने खोदा। उसके बाद गॅस का पाईप लाईन डालने के लिए गॅस वालों ने खोदा। फिर पानीवालों का काम था तभी पानी वालो ने खोदा। स्थिती यह है की, अपने महानगरपालिका की जो जिस डिपार्टमेंट के खोदते है वह उसका पॅचवर्क करता है। लेकीन उस रोड की अवस्था ऐसी होगी की तीन जगह से खोदा गया उसमे पॅच वर्क करता तो ३ लाईन्स अलग अलग हो जाती है और उन्होंने उसी ढंग से कहाँ स्थिती वहाँ की जाकर देखते है तो इंन्सान पैदल नही चल पा रहा है। तो मेरा यह कहना था की, पैसा तो डिपार्टमेंट का जा ही रहा है। केंद्र बिंदु एक जगह करके उसको लेकर पूरे रोड को एक साथ मे रोड बनायेंगे तो रोड की अवस्था भी रही रहेगी। नही तो एक एक स्ट्रिप डालकर पानीवाला स्ट्रीप डाल दिया, यह एक स्ट्रीप डाल दिया फिर वह रोड की अवस्था इधर उपर इधर निचे ऐसी अवस्था हो रही है। तो इसके बारे मे देखकर स्थिती देखकर निर्णय लेकर करेंगे तो बढीया रहेगा और खासकर आप गिता नगर मे जरुर सर्व्हे किजिए।

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, टॅक्स बद्दल बोलायचं आहे. माझ्या स्वतःच्या घराचं जे टॅक्सचं बिल आलेलं आहे मी मागील वर्षी टॅक्स भरलेला आहे. परंतु, त्याच्यात शिक्षण कर, पाणीपट्टी कर असे मला परत थकबाकी दाखवतात. मालमत्ता करामध्ये सर्व साधारण कर मी भरलेला आहे. परंतु, ते का दाखवलं. ज्यावेळी चेक दिला त्या अमाऊंटचा दिला. ती थकबाकी कशाला दाखवली? याच्यामध्ये ही घोळ कशी काय झाली? आणि मताच कशाला? अन्य काही नागरीकांना पण तसं झालं असेल कर विभागामध्ये नोटींग बरोबर होत नसेल किंवा काम करणारा अधिकारी बरोबर नसेल किंवा त्यांची चुक झाली असेल त्यांनी निवेदन करावं त्याबद्दल

**दिपक सावंत :-**

मा. सभापती साहेबांच्या परवागनीने बोलतो. लास्ट ईयर सन २०१०-११ मध्ये जी बिलं गेली होती त्याच्यामध्ये २ कर वाढले होते. ते इन्क्लुड करुन होते. त्यावेळेस आपण बिलं पाठवताना जे दोन कर जे आहे. ते इंटरनल ॲडजस्टमेंट बिल मध्ये खाली इंटरनल ॲडजस्टमेंट दिली त्या दोन्ही कराचे पैसे भरले नसतील आणि मागच्या वेळेला डिमांड केली असेल तर ह्यावेळी ते वजा करुन टोटल टाकून आलेली आहे. तुम्हाला जे बिल आले आहे ते दाखवा.

**शशिकांत भोईर :-**

मी एक उदाहरण दिलं पण अन्य नागरीकांच काय? त्यांना काय ते भरतील ना सहजासहजी.

**भगवती शर्मा :-**

इनके कहने का मतलब क्या है? मैने भी कॉम्प्युटर मे देखा। प्रोग्रॅम के अंदर यह अलग से कैसे आ गया? उनके कहने यह है की, आपने प्रोग्रॅम फिट किया तो नही आना चाहीए। इंम्पॉसिबल है जब प्रोग्रॅम मे ऐसे फिअ किया तो । तो वह आया है तो कैसे आया है?

**मा. आयुक्त :-**

एक सॉफ्टवेअर आहे. प्रॉपर्टी टॅक्स चा त्याच्यामध्ये फक्त इंन्टरन्स फिड करतो आणि बिल स्वतःहून येते ते सॉफ्टवेअर मध्ये चुक आहे. असं आपलं म्हणणु आहे का? की आपल्या बिलमध्ये काही चुक आहे?

**शशिकांत भोईर :-**

माझ्या बिलामध्ये नाही. मी बिल भरलेलं आहे.

**मा. आयुक्त :-**

आपल्या बिलात चुक आहे की, सॉफ्टवेअर मध्ये चुक आहे? आपलं काय म्हणनं आहे की सगळ्यामध्ये चुक आहे का? असं नाही आहे. मला जी माहिती मिळालेली आहे. त्याच्यामध्ये काय झालं की, मागच्या वेळेला आम्ही दोन एक्स्ट्रा टॅक्स लावले होते. मग त्या टॅक्स ला यावर्षी ॲडजेस्ट केलं म्हणजे त्याला कमी केलं आणि बिलामध्ये मायनस केलं आणि टॅक्स मागच्या वेळेला सुटला होता सिवरेज टॅक्सचं ते यावर्षी ॲड केलं असं काही झालेलं नाही म्हणून असं येते. आपल्या बिलामध्ये काही चुक असेल ते दाखवा ते आम्ही चेक करु आणि सर्व सामान्यच असं काही असेल तर ते पण आम्ही चेक करु.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, त्याबिलामध्ये शिक्षण कर, दिवाबत्ती कर, रस्ता कर हे सगळे मला रिपीट आले.

**भगवती शर्मा :-**

साहब, इसमे अपून ने सिर्फ दो कर ॲड किया है।

**शशिकांत भोईर :-**

लेकीन उसमे दुसरा आया है, उसका थकबाकी दिखा रहा है ना।

**मा. आयुक्त :-**

अपना बिल दिखाईये फिर समज मे आएगा।

**शशिकांत भोईर :-**

प्रकरण क्र. ८० मध्ये माझी सुचना आहे की, स्थानिक संस्था कर, जन्म-मृत्यु दाखले, मार्केट व लायसन्स तसेच तक्रारी याबाबत ऑनलाईन सेवा सुरु करावी.

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ७९ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (संगणक विभाग) मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विविध विभागांना संगणक खरेदी करणेबाबत.

**ठराव क्र. ६८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका संगणक विभागाने खालील विभागासाठी संगणक पूरवठा करणे कामी दि. २४/०२/२०११ रोजी प्रथमतः निविदा ई-टेंडरिंग संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यांत आली होती.

| **अ.क्र.** | **विभागाचे नाव** | **नग** |
|---|---|---|
| ३. | पाणी पुरवठा विभाग | १५ |
| ४. | सार्वजनिक बांधकाम विभाग | ४ |
| | **एकुण** | **१९** |

त्यानुसार दि. ०३/०३/२०११ रोजी दु.१.०० वाजेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. परंतू त्यावेळी प्राप्त निविदेचे दर शासनाचे दरकरार पेक्षा जास्त आले असल्याने फेर निविदा दि. १९/०५/२०११ रोजी प्रसिद्ध करण्यांत आली होती. फेर निविदेची अंतिम मुदत दि. ३०/०५/२०११ रोजी दु.१.०० वाजेपर्यंत होती. त्यानुसार निविदेमध्ये फक्त १ निविदा धारकाची निविदा प्राप्त झालेली आहे.

सदर निविदा उघडावी अथवा नाही अथवा शासन दर करारनुसार संगणक खरेदी करावेत, याबाबत मा. आयुक्त सो यांना सादर केले असता मा. आयुक्त सो यांनी फेरनिविदा काढणेकरिता होणारा वेळेचा अपव्यय व खर्च विचारात घेता शासन दर करारानुसार (DGS & D/महाराष्ट्र शासन IT Dept) खरेदी करणे बाबत मंजूरी दिलेली आहे. महाराष्ट्र शासनाच्या दर करारामध्ये खालील तपशिलाप्रमाणे ब्रँड उपलब्ध आहेत.

| **Sr.no.** | **Item No.** | **Item Description** | **Make** | **Price per unit** |
|---|---|---|---|---|
| 2. | AO2W | High end PC intel processor & Window Preloaded Windows 7 Professional 64 bit with Certificate of Authenticity recovery/ restore media CD along with patches and updates for 3 years. Preloaded McAfee/Quick Heal/MS Security essentials Antivirus along with patches & updates for 3 years.<br>Acer – Vertion M 200 Series<br>Intel Core™ I3-550 Processor @3.2 GHz<br>Intel H57 / Inetl Q57<br>OEM Motherboard with 2 PCI, PCI Express X 16 downward compatible to PCI Express X1, 1-Seriel,1RJ45, 1-VGA,4-USB, Line in line out, mic, integrated graphics and sound device.<br>18.5" Wide TFT 1024X768, Above TCO 03 Certified, Monitor of the same make of offered PC brand<br>4 GB DDR3 SDRAM @ 1066 MHz expandable to 8 GB Min, 1 DIMM Slot free for Future upgrade @ 320 GB SATA HDD @ 7200 rpm<br>Integrated 10/100/1000Mbps Gigabit LAN with Wake On LAN Support, ONE Serial port, Min 4 USB 2.0 port of which at least two should be on front side, 1-Parallel, 2 PS2, 1 RJ45, 1-VGA,2 Line in (Stereo/micro phone); 2 Line – out (headphone / Speaker )<br>Heavy duty Bi-Ligual (INSCRIPT)Etched Membrane Keybord | Acer | 29,178/-<br>(Excluding taxes) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | & Optical Mouse<br>DVDRW | | |

एकुण १९ संगणक खरेदीसाठी रु. ५,५४,३८२/- (अधिक कर) खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त प्रस्तावास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. ८० :-**

मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (संगणक विभाग) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्वतंत्र संकेतस्थळ (Website) बाबत मा. स्थायी समिती सभेत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ६९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मनपाचे संकेतस्थळ **(**Website**)** विकसित करण्याचे काम सन २००६ वर्षी कल्याण डोंबविली मनपास देण्यात आले होते. याकामी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस दि.३१/०३/२००६ रोजी करारबद्द केले आहे. पण सदर संकेत स्थळ तयार करण्यासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या प्रस्तावाचे तांत्रिक दुष्टया अवलोकन केल्यास मिरा भाईंदर मनपाला खलीलप्रमाणे रक्कम अदा करावी लागणार होती.

| अ.क्र. | तपशील | एकूण रक्कम | आगाऊ देण्यात आलेली रक्कम |
|---|---|---|---|
| १ | Phase I | ५,००,०००/- | २,५०,०००/- |
| २ | Phase II | प्रस्तावात नमुद नाही. | ------- |
| ३ | Phase III | प्रस्तावात नमुद नाही. | ------ |

वर नमुद केलेल्या फेस च्या सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे.

**Phase I :-**

- Website Hosting Infrastructure and Domain Name Registration shall be a responsibility of MBMC
- MBMC shall be a solely responsible for regularly preparing and uploading the data on the EIP
- The initial content required for the launch of the portal should be delivered to KDMC in the format and within time period discussed and agreed between MBMC and KDMC

**Phase II :-**

- Complete Readiness i.e. Acceptance by MBMC and Implementation at MBMC for a minimum period of 2 months or so the backend i.e. MAINet Application Software Modules related to the services to be delivered online on the EIP
- The required master data for EIP should be made available to KDMC in soft copy format or should be entered in to the EIP master database by MBMC
- The logistics and other requirement associated with the accepatance of online application etc. is the responsibility of MBMC

**Phase III:-**

- Agreement with Bank for Payment Gateway Integration Integration Scripts to connect EIP to their Payment Gateway

मे.कल्याण डोंबीवली मनपा यांनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या Website मध्ये Phase I बाबत कार्यवाही करण्यात आली होती. या पुढील Phase II & Phase III चे दर प्रस्तावात नमुद नव्हते.

तद्नंतर मे.पेनसिया सॉफटेक या ठेकेदाराकडुन दरपत्रक मागवून मनपाचे संकेतस्थळ विकसित करणे कामी या कार्यालयाचे मनपा/संगणक/४३१/२००-१०, दि. ०२/०३/२०१० रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत. त्या अन्वये मे. पेनसिया सॉफटेक या कंपनीने मनपाची Website विकसित केलेली आहे. परंतु सदर Website ही Static स्वरुपाची आहे. यामध्ये Online द्वारे मालमत्ता कर भरणा, पाणी पुरवठा कर भरणा, मोबाईल द्वारे मालमत्ता कर व पाणीपुरवठा कर भरणा सुविधा उपलब्ध नाहीत. त्याचप्रमाणे Content Management System (cms) उपलब्ध नाही. त्यामुळे मनपाच्या विविध विभागांच्या Data दैनंदिन Update किंवा Upload करणेस program मधील code मध्ये जाऊन बदल करावा लागतो. त्यास बराच काळावधी लागतो.

तद्नंतर दि. ०३/०९/२०११ रोजी मे ABM Knowledge Ware Ltd.(प्रतिनिधी कल्यास डोंबिवली मनपा) यांनी EIP ची नविन आवृत्ति पुरवठा करणेबाबत कळविले आहे. यामध्ये Online Payment Gateway द्वारे Property tax module Implement करणेबाबत नमुद केले आहे. यासाठी २.५ लाख रुपये थकीत असलेली रक्कम त्यांना अदा करावी लागणार आहे.

दि. ०७/०९/२०११ रोजी Mastek Ltd या कंपनीने मनपाची Website विकसित करणेकामी प्रस्ताव पाठविलेला आहे. यामध्ये खालील बाबीचा समावेश आहे.

1. Information Architecture Redesign
2. Technology Upgrade/Redesign
3. MBMC Website redesign (mbmc.gov.in)
4. Online Payment for Water Billing
5. Online Payment for Property Tax
6. Mobile Payment of water Bill and Property Tax
7. Website
8. Page Design
9. Content Management System (CMS)
10. Security
11. Access Levels Provision
12. Warranty

Mastek's Ltd या कंपनीने याकामी रु ९,९९,६३१/- रकमेचा प्रस्ताव सादर केला आहे.

याकामी मे. अे.बी. एम. नॉलेजवेअर लि. (प्रतिनिधी कल्याण डोंबीवली मनपा) यांनी रु. २,५०,०००/- च्या पुनच्छ सादर केलेल्या प्रस्तावास मंजूरी देणे अथवा मे. Mastek's Ltd यांचे रु. ९,९९,६३१/- वरील प्रमाणे प्रस्तावास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५ नियम (२), पो.नि. (२) चे परंतुकानुसार निविदा न मागविता संविदा करणेबाबत मंजूरी देणे. असे पर्याय उपलब्ध आहेत. सदर बाबत मा. आयुक्त सो. यांनी दि. २४/०७/२००९ रोजी मंजुरी दिलेली आहे.

वरीलपैकी M/s. MASTEK LTD यांचे प्रस्तावास ही सभा मंजुरी देत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सभा संपली असे मी जाहीर करतो.

**सभा संपल्याची वेळ - दु. १.१० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**